# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, 3 रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - 400 614.
दिनांक 03 मार्च 2020.

## <u>कार्यक्रम पत्रिका</u>

नवी मुंबई महानगरपालिकेची <u>मार्च महिन्याची सर्वसाधारण सभा, बुधवार, दिनांक 11 मार्च 2020 रोजी सकाळी 11.00 वाजता</u> बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील <u>राजमाता जिजाऊ सभागृह</u> येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

1. इतिवृत्त कायम करणे. (शुक्रवार, दिनांक 19 जुलै 2019, मंगळवार, दिनांक 20 ऑगस्ट 2019, गुरूवार, दिनांक 29 ऑगस्ट 2019 (दुसरी सर्वसाधारण सभा) शुक्रवार, दिनांक 30 ऑगस्ट 2019 (विशेष सभा) शुक्रवार, दिनांक 13 सप्टेंबर 2019, बुधवार, दिनांक 20 नोव्हेंबर 2019, शुक्रवार, दिनांक 13 डिसेंबर 2019 (विशेष सभा)).
2. प्रश्नोत्तरे (यादी सोबत प्रसृत करण्यांत येत आहे).
3. नवी मुंबई महानगरपालिकेचा सन 2019-2020 चा सुधारीत आणि सन 2020-2021 चा अर्थसंकल्प "अ" आणि "क."
4. नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचा सन 2019-2020 चा सुधारीत आणि सन 2020-2021 चा अर्थसंकल्प "ब."
5. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरणाचा सन 2019-2020 चा सुधारीत आणि सन 2020-2021 चा अर्थसंकल्प.
6. नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांना आवश्यक असलेले छापील रजिस्टर्स, फॉर्मस व पावती पुस्तके यांची छपाई करणेकरीता व्दिवार्षिक दरकरार करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 03/02/2020 चे पत्र क्र. नमुंमपा/भांडार/39/2020.
7. “महाराष्ट्र महानगरपालिका स्थावर मालमत्ता भाडेपटटा नुतनीकरण अथवा हस्तांतरण” नियम 2019 च्या अंमलबजावणी प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/02/2020 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/342/2020.
8. घणसोली विभागातील साईबाबानगर जवळ RCC गटर व Retaining wall बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2020 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./752/2020.
9. बेलापुर विभागातील से. 8बी दुर्गामाता नगर येथील डिटेशंन पॉन्डची सुधारणा करणे या कामास सुधारीत प्रशासकिय मंजुरी मिळणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 28/02/2020 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./772/2020.
10. तुर्भे क्षेपणभुमी येथील पाचव्या सेल करीता पावसाळी गटर बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 02/03/2020 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./815/2020.
11. नेरुळ विभागातील रस्त्यांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 02/03/2020 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./822/2020.
12. परिवहन उपक्रमाच्या कालबाहय झालेल्या 51 बसेस व 2 हलके वाहन निर्लेखन करण्याच्या प्रस्तावाबाबत, परिवहन व्यवस्थापकांचे दिनांक 02/03/2020 चे पत्र क्र. नमुंमपा/परि/तां.भांडार/26/2020
13. नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयांकरीता रुग्णालयीन फर्निचर खरेदीसाठी प्रशासकिय मान्यता मिळणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 03/03/2020 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/1281/2020.

---

* **प्रस्तुत विषय क्र. 3 ते 5 यावर त्याच दिवशी म्हणजेच बुधवार, दिनांक 11 मार्च 2020 रोजी चर्चा करण्यात येईल, याची सर्व सन्मा. सदस्यांनी नोंद घ्यावी, ही विनंती.**

**14 ते 16. श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून आलेल्या दिनांक 27/02/2020 च्या ठरावाच्या सूचना :-**

(14) "प्रभाग क्र.110 करावे मधील गावदेवी मैदानाची सांस्कृतिक मैदान अशी ओळख आहे, सदरील मैदान हे अंदाजे 10000 चौ.मीटरचे आहे. करावेगाव हे नवी मुंबईतील सर्वात मोठे गाव असुन करावेगावातील नागरिकांना लग्न समारंभ, साखरपुडा समारंभ, वाढदिवस समारंभ व इतर धार्मिक कार्यासाठी सभागृह नाही. तरी सदरील मैदानामध्ये 1500 चौ.मीटरचे समाजमंदीर बांधण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(15) "पामबीच रोड पश्चिमेकडील टी.एस.चाणक्येच्या कंपाउंडच्या सरंक्षक भिंतीच्या मागच्या बाजुला समुद्र किनारी सरंक्षक भिंतीला लागुन व चाणक्य जेट्टी पर्यंत लागुन 6 मीटर रुंदीचा रस्ता बांधण्यात यावा व त्याच ठिकाणी 500 चौ.मीटर भुखंड मोकळा असुन तेथे दशक्रिया या धार्मिक विधीसाठी शेड बांधण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(16) "करावे पामबीच मार्गालगत संरक्षण खात्याच्या (Defense Land) जमिनीच्या बाजुस 20 एकर मोकळी जागा असुन त्यालगत मँग्रोस व खाडीचे क्षेत्र आहे. केंद्र शासनाचे CRZ बाबतचे नियम व कांदळवनाबाबतच्या शासनाच्या तरतुदी विचारात घेता सदर मोकळया जागेवर कोणत्याही इमारतीचे बांधकाम शक्य नाही. त्यामुळे सदर ठिकाणी समुद्र उद्यान (मरीन उद्यान) विकसित करण्यास सदर जागा सुयोग्य असल्याचे दिसुन येते. या उद्यानामध्ये मरिन अॅक्वारियम, विविध प्रकारच्या माशांच्या सांगाडयांची प्रदर्शने तलाव, वॉकिंग ट्रॅक व सायकलिंग ट्रॅक, मरिन फुड प्लाझा व इतर आवश्यक सोई सुविधा इत्यादी बाबी सदर ठिकाणी करणे शक्य आहे. त्यामुळे नवी मुंबई क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना सदर उद्यान फायदेशीर ठरेल. तसेच नागरिकांना मनोरंजनाचे ठिकाण उपलब्ध होईल. सदरील ठिकाणी समुद्र उद्यान (मरीन उद्यान) विकसित करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**17 . श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून आलेली दिनांक 27/02/2020 ची ठरावाची सूचना:-**

"सीबीडी वॉर्ड क्र.103 मध्ये सेक्टर 8 येथे असलेले आदिवासी पाडा असून त्याला आदिवासी पाडा म्हणून ओळख असावी त्यासाठी बेलापूर गावाचे प्रकल्पग्रस्त रहिवासी असून त्याच्या पिढ्या अन पिढ्या या पाडयात होऊन गेल्या आहेत. परंतु आतापर्यंत त्यांना आदिवासी म्हणून कोणी ओळखत नाही. किंबहुना त्यांची ओळख संपुष्टात येत चालली आहे, त्यासाठी त्यांना आदिवासी पाडा साठी प्रवेशद्वार बांधण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

18 ते 20. **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून आलेल्या दिनांक 27/02/2020 च्या ठरावाच्या सूचना :-**

(18) "नेरूळ, सेक्टर 16 ए, 16 व 18 येथे स्वच्छता पाहणी अभियान राबवुन परिसरातील डेब्रीज व कचरा पुर्णपणे साफ करण्यात यावा, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(19) "नेरूळ, सेक्टर 16 ए, येथील प्रथमेश आणि आशिर्वाद सोसायटी पाठीमागील रस्त्यालगत गटर बांधयात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(20) "नेरूळ, सेक्टर 16 ए, 16 व 18 परिसरात अत्यंत आवश्यक असलेल्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसविण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

21 ते 23. **श्रीम. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून आलेल्या दिनांक 27/02/2020 च्या ठरावाच्या सूचना :-**

(21) "सानपाडा से. 4 श्री दत्तगुरु, कस्तुरी, सप्तपर्णी व अश्वथा सोसायटी अंतर्गत असलेली घरे भुखंड क्षेत्रफळानुसार असुन, स्वमालकी तत्त्वाची आहेत. बहुतांश सदनिकाधारकांनी गरजेपोटी वाढीव बांधकाम केले असल्यामुळे पाण्याची कमतरता संपुर्णता वसाहतीला भेडसावत आहे. पाण्याचे नियोजन करतांना सोसायटी पदाधिकारी व सदनिकाधारक यांच्यामध्ये वाद होत आहे. तरी श्री दत्तगुरु, कस्तुरी, सप्तपर्णी व अश्वथा सोसायटी अंतर्गत सदनिकाधारकांना स्वमालकी तत्त्वाचे स्वतत्र नळ जोडणी देण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(22) "सानपाडा प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी आपल्या जमिनीवर गरजेपोटी बांधकाम केले आहे. परंतु सदर बांधकाम करताना नवी मुंबई महानगरपालिका प्रशासन परवानगी नाकारत असल्याने, कोणती ही कायदेशीर सुविधा प्रकल्पग्रस्तांच्या बांधकामास दिली जात नाही. सन 1995 व 2000 पर्यतची जी बांधकामे आहेत ती सर्व बांधकाम ग्राहय धरावी व त्यांना सुविधा देण्यात यावीत असा शासन अदयादेश आहेत. तसेच डिसेंबर 2015 पर्यतची सर्व बांधकाम नियमित करण्याचा शासन निर्णय झाला असताना ही नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांना या सर्व शासन अदयादेश व शासन निर्णयापासुन वंचित ठेवण्यात येत आहे. तरी सानपाडा प्रकल्पग्रस्तांनी बांधलेल्या बांधकामास कायदेशीर शुल्क आकारुन, नळ जोडणी देण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(23) "सानपाडा से. 4 श्री दत्तगुरु, कस्तुरी, सप्तपर्णी व अश्वथा सोसायटी अंतर्गत सी टाईप असलेला रस्ता हा अरुंद आहे. सोसायटीतील सदनिकाधारक व सोसायटी भाडेतत्त्वावर असलेले रहिवाशी यांच्यात वाहन पार्किग बाबत समन्वय नसल्याने, संपुर्णता रस्ता हा वाहनाने व्यापलेला असतो. तसेच सदर ठिकाणी काही दुर्घटना उदभवल्यास ॲम्ब्युलन्स ही जाऊ शकत नाही. तरी सदर परिसराची निकड ओळखुन, सानपाडा से. 4 श्री दत्तगुरु, कस्तुरी, सप्तपर्णी व अश्वथा सोसायटी अंतर्गत सी टाईप असलेल्या रस्त्यावर दोन गेट बांधण्यात यावेत, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**24 ते 26. श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून आलेल्या दिनांक 27/02/2020 च्या ठरावाच्या सूचना :-**

(24) "सानपाडा विभागात रहिवाशी संकुलात मोठया प्रमाणात वाढ होत असताना वाहन पार्किगची मोठी समस्या सानपाडा वासियांना भेडसावत आहे. वाशी छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात ज्या प्रमाणे उघडे नाले बंदिस्त करुन पार्किग सुविधा देण्यात आली. त्याचप्रमाणे सानपाडा से. 6 ते जुईनगर रेल्वे स्टेशन पर्यतचा नाला बंदिस्त करुन सदर ठिकाणी वाहन पार्किगची व्यवस्था करण्यात यावी, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(25) "सानपाडा शिवमंदीर ते जुईनगर रेल्वे स्टेशन पर्यतच्या पावसाळी पाण्याची दयनीय अवस्था झाली आहे. सदर नाल्यातुनच सायन पनवेल महामार्गावर सानपाडा नाका व तुर्भे एमआयडीसी कारखाने तसेच डोंगरावरुन येणा-या पाण्याचा निचरा होत असतो. सदर नाल्याच्या दुर्दशेमुळे या वर्षी सानपाडा अंडरपास मधील पावसाळी पाण्याचा निचरा व्यवस्थितरित्या न झाल्यामुळे समस्त सानपाडा वासियांना त्याचा नाहक त्रास झाला. तरी सदरील संपुर्ण नाल्याचे नुतनीकरण करण्यात यावे, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(26) "सानपाडा से. 6 व 10 सरस्वती को. ऑ.हौ.सो., सानपाडा से. 10 मिलेनियम हॉस्पीटल से. 5 , गजानन महाराज चौक तसेच सानपाडा स्व.नथु जोमा पाटील चौक, स्व.चिंतामण गणपत चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, स्व.यशवंत मढवी चौकात हायमास्ट बसविण्यात यावेत, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**27 व 28. श्रीम. दमयंती बबन आचरे, यांजकडून आलेल्या दिनांक 02/03/2020 च्या ठरावाच्या सूचना :-**

(27) "प्रभाग क्र.43, कोपरखैरणे मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून आवश्यक त्याठिकाणी C.C.T.V कॅमेरे बसविण्यात यावेत, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

(28) "प्रभाग क्र.43, कोपरखैरणे मधील जुन्या, जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलण्यात याव्यात, असे या सभेचे मत आहे.

"2. वरील परिच्छेद क्र. 1 मध्ये व्यक्त केलेल्या मताची अंमलबजावणी व उचित कार्यवाही करण्याची आयुक्तांना विनंती करण्यात यावी."

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक : 03 मार्च 2020.**